# किटकशास्त्र विभाग

## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला-४४४१०४

जा.क्र. वि.प्र./किवि/ २६५/२०२५ दिनांक: ०४/०७/२०२५

## निविदा

**विषय: किटकशास्त्र विभागातील जडवस्तू संग्रहाची व इतर वस्तूंची विक्री करण्याकरिता निविदा बोलविणेबाबत...**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, किटकशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथील कार्यालयातील जड वस्तू, लोखंडी व लाकडी वस्तू, निरुपयोगी संगणक व प्रयोगशाळेतील निरुपयोगी उपकरणे इत्यादी कार्यालयीन साहित्य आहेत. त्या अनुषंगाने, सदर वस्तू किटकशास्त्र विभागामध्ये पाहण्याकरिता ठेवण्यात आले आहे. सदरील वस्तूंची व्यक्तीशः पाहणी करून आपले दर किटकशास्त्र कार्यालयास कार्यालयीन वेळ सकाळी १०:०० ते सायंकाळी ०६:०० पर्यंत दि.: ११/७/२०२५ च्या आत पुरविण्यात यावे.

उपरोक्त वस्तूंची विक्री करण्याकरिता निविदा दर पुरविणाऱ्यांनी निविदासोबत रु. ३०००/- अमानत रक्कम रोख स्वरुपात व सदर व्यक्तीचे आधार कार्डची स्वयम साक्षांकित झेरॉक्स प्रत सीलबंद निविदासोबत कार्यालयास जमा करावी. कार्यालयास प्राप्त झालेल्या संपूर्ण निविदा दि.: ११/७/२०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता गठीत केलेल्या कार्यालयीन समितीसमोर उघडण्यात येतील.

**लिलावाच्या अटी व शर्ती:-**

१. लिलावात निघालेले भंगार निरुपयोगी वस्तू, प्रयोगशाळा साहित्य, संगणक, भांडी आणि लाकडी साहित्य यांच्या लिलाव जसे आहेत जिथे आहेत या तत्वावर केल्या जाईल.
२. जुन्या भंगार साहित्याच्या लिलावात समावेश असून त्याचा लिलाव करण्यात येईल.
३. लिलाव समिती बोलणी बोलणाऱ्या व्यक्तीची जास्तीत जास्त बोली मान्य असेल त्यांना लिलावाची बोली पाहून मान्यता देण्यात येईल व त्याबाबतचा अंतिम निर्णय गठीत समिती घेईल.
४. अपेक्षित किंमत आल्याशिवाय लिलावाची बोली मान्य करणे लिलाव समितीच्या निर्णयावर अवलंबून राहील.
५. साहित्य बोली कायम झाल्यास किंमतीच्या ५० टक्के रक्कम त्याच दिवशी उर्वरित ५० टक्के रक्कम लिलाव अंतिम झाल्यापासून तीन दिवसात भरावी लागेल. रक्कम न भरल्यास सदर लिलाव रद्द करण्यात येईल.
६. बोली कायम झाल्यास संबंधित व्यक्तींनी सर्व साहित्य ताब्यात मिळताच स्वखर्चाने उचल करणे व वाहून नेण्याची त्यानंतर सर्व खर्चाची व जोखमेची जबाबदारी त्याची स्वतःची असेल.
७. लिलाव कोणत्याही कारणास्तव रद्द करण्याचा अधिकार गठीत समितीकडे राखून ठेवला आहे.
८. लिलावाबाबत काही तक्रार असल्यास त्याच दिवशी तशी लेखी स्वरुपात लिलावाच्या ठिकाणी लिलाव संपेपर्यंत द्यावी. अन्यथा तक्रारीचा विचार करण्यात येणार नाही.
९. लिलाव समितीचे सदस्य व संबंधित कार्यालयीन कर्मचारी लिलावाचे ठिकाणी उपस्थित राहू शकतील व निरीक्षण करतील.

विभाग प्रमुख
किटकशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला